
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ



Model Paper

Marathi Medium

English Medium

aglasem.com

प्रथम भाषा : मराठी – इयत्ता : सहावी

इयत्ता : सहावी – विषय : मराठी (लेखी)

विद्यार्थ्याचे नाव : _____ **हजेरी क्रमांक :** ☐

शाळेचे नाव : _____ **तुकडी :** _____

केंद्र : _____ **ता.** _____ **जि.** _____ **दिनांक :** / /

	लेखी							तोंडी		प्राप्त गुण			शिक्षक स्वाक्षरी
प्रश्न क्रमांक	१	२	३	४	५	६	७	८	९	मूलभूत क्षमता प्रश्न क्र. १ व ८	इयत्तेच्या क्षमता	एकूण	
प्राप्त गुण													
कमाल गुण	५	५	५	५	१०	५	५	५	५	१०	४०	५०	

प्र. १. शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) _____ २) _____

३) _____ ४) _____

५) _____ ६) _____

७) _____ ८) _____

९) _____ १०) _____

docs.aglasem.com
aglasem.com

प्र. २. खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

अजय आठवीत शिकणारा मुलगा. अत्यंत साधा, सरळ आणि सहकार्यवृत्तीचा. अभ्यासात जेवढा हुशार, तेवढाच खेळातही प्रवीण. जसा मैदानं गाजवायचा, तसा वर्गातल्या मुलांच्या अभ्यासातल्या अडचणी सोडवायला एका पायावर तयार असायचा. त्यामुळे सगळ्यांना तो आपला वाटायचा. अगदी शिक्षकांचाही तो आवडता विद्यार्थी होता.

शाळेत सहलीचे वारे वाहू लागले, तसा अजय हिरमुसला, कारण त्याला माहीत होते, सहलीची फी आई भरू शकत नाही. घरातली ओढाताण त्याला जाणवत होती. त्यामुळे त्याने सहलीचा विषय घरात काढला नाही; पण आईला कुठून तरी सहलीचे समजले. तिने अजयला सहलीची फी दिली. त्याचा आनंद गगनात मावेना. तो पहिल्यांदाच सहलीला जात होता, त्यामुळे त्याच्या डोक्यात सहलीचा विचार सतत डोकावत होता. 'कधी एकदाचा सहलीचा दिवस उजाडतो.' असे त्याला झाले होते. सहलीचा दिवस निश्चित झाला. त्याची सहल शनिवारी जाणार होती.

अ) अजयला खूप आनंद का झाला? (गुण १)

_____

ब) वरील उताऱ्यात वर्णन केलेली अजयची कोणतीही चार गुणवैशिष्ट्ये लिही. (गुण २)

_____

_____

_____

क) अजयने सहलीचा विषय घरात का काढला नाही? (गुण २)

_____

_____

_____

docs.aglasem.com

aglasem.com

प्र. ३. खालील कविता मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

या काळाच्या भाळावरती, तेजाचा तू लाव टिळा
आणि फुलू दे तुझ्या श्रमातुन मानवतेचा इथे मळा ।।धृ।।
नित्य नवी तू पाही स्वप्ने
साकाराया यत्न करी
सूर्यफुलांच्या फुलवी बागा
उजेड यावा घरोघरी
वाहत येवोत समृद्धीच्या
नद्याच सगळ्या खळाखळा ।।१।।
काट्यांमधल्या वाटांमधुनि
चालत जा तू पुढे पुढे
या वाटा मग अलगद नेतील
पाऊस भरल्या नभाकडे
झळा उन्हाच्या सरुन जातील,
नाचत येईल पाणकळा ।।२।।

अ) कवीच्या मते श्रमातून कशाचा मळा फुलणार आहे? (गुण १)

_____

ब) कवीच्या मते कोणतीही गोष्ट साध्य करायची असेल तर काय केले पाहिजे? (गुण २)

_____

_____

क) भरल्या नभाकडे जाणारी वाट अडचणीची आहे हे कोणत्या ओळींतून कळते? त्या ओळी येथे लिही. (गुण २)

_____

_____

docs.aglasem.com
aglasem.com

प्र. ४. खालील मजकूर मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

पिंपळाखाली चांद उभा होता. त्याचा कळप त्याच्यावर विसंबून निर्धास्तपणे वावरत होता. चांद आतून अस्वस्थ होता. त्याला नुकतानुकता चार दिवसांपूर्वी घडलेला प्रसंग आठवला...

पहाड कमालीचा थकला होता. त्याला त्याच्या मस्तकाचे ओझे पेलत नव्हते. फांदी तोडायला सोंड वर करणे जड झाले होते. त्याचे पाय स्वत:चे ओझे पेलताना, ओढताना लटपटत होते. उजाडल्यापासून रात्रीच्या मुक्कामाला एखाद्या निवांत जागी चांद आणि सर्व कळप थांबेपर्यंत होणारी पायपीट, दडादडा धावणे, उतरणीवर तोल सांभाळणे, पुढल्या पायांवर जोर देत उभा चढ चढणे. तो कळपाच्या मागे खुरडत चालला होता. फरफटत होता.

(वाचू आनंदे : चिरनिद्रा – अनंत मनोहर)

अ) कळप कोणावर विसंबून निर्धास्तपणे वावरत होता? (गुण १)

_____

ब) पहाडला कोणत्या बाबी करणे अशक्य झाले होते? त्या दोन बाबी लिही. (गुण २)

_____

_____

क) वरील उताऱ्यात 'पहाड' हा शब्द कोणत्या प्राण्यासाठी वापरला आहे? हे तुला कोणत्या वाक्यावरून कळले ते वाक्य येथे लिही. (गुण २)

_____

_____

प्र. ५. खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव.

अ) खालील वाक्यांमधील कर्ता व कर्म ओळखून लिही. (गुण २)

कॅरम खेळतो अविनाश.

कर्ता : _____ कर्म : _____

docs.aglasem.com

aglasem.com

ब) खाली दिलेल्या उताऱ्यातील सर्वनामे शोधून लिही. (गुण २)

अथर्वला झाडांबद्दल खडान्‌खडा माहिती असून त्याची स्वत:ची रोपवाटिका घराच्या परिसरातच आहे. एके दिवशी त्याने विचारले, ''येतोस का तू झाडे पहायला?'' लगेच मी तयार झालो.

_____

क) तुला माहीत असलेले एक संयुक्त क्रियापद लिही व त्याचा वापर करून एक वाक्य लिही. (गुण २)

जसे : संयुक्त क्रियापद – खाऊन टाक.

वाक्य – शीतल, एवढा लाडू खाऊन टाक.

संयुक्त क्रियापद : _____

वाक्य : _____

ड) खाली दिलेल्या वाक्याचा काळ ओळख व त्याच काळाचे एक नवीन वाक्य लिही. (गुण २)

माधवीने पेरू खाल्ला.

काळ : _____

वाक्य : _____

इ) खालील वाक्य वाच. वाक्याशी संबंधित योग्य म्हण कंसातून निवडून लिही. (गुण १)

(दुरून डोंगर साजरे, असतील शिते तर जमतील भुते, सारा गाव मामाचा नि एक नाही कामाचा)

आमचे इतके मित्र आणि नातेवाईक आहेत गावात! वाटले होते, अडचणीला सगळे हात पुढे करतील; पण कसले काय! _____

_____

फ) खालील वाक्य वाच. वाक्याशी संबंधित योग्य शब्दसमूह कंसातून निवडून लिही. (गुण १)

(प्रभावित होणे, नवल वाटणे, थक्क होणे)

सर्कशीत स्टूलवर उभा राहिलेला हत्ती पाहून लहानग्या शशीला _____

docs.aglasem.com

aglasem.com

प्र. ६. १५ ऑक्टोबर 'वाचन प्रेरणा दिन' या निमित्त शाळेत निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. त्यासाठी तू पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर लिही. (गुण ५)

१) मला आवडलेले पुस्तक २) पुस्तक बोलू लागले तर... ३) वाचनाचे महत्त्व

docs.aglasem.com
aglasem.com

प्र. ७. खाली काही शब्द दिलेले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही.

शेती, जहाज, रात्र, दप्तर (गुण ५)

docs.aglasem.com

aglasem.com